## रे.क.न. ५५/२०२२ मधील निशाणी क्रमांक ५ खालील आदेश

वादी यांनी प्रस्तुतचा दावा कायम मनाईसाठी दाखल केला आहे.

०२. दावा मिळकतीमधील वादींच्या मालकी व शांततामय कब्जेवहिवाटीस प्रतिवादी अगर तर्फे इसमांनी कोणत्याही प्रकारे हरकत व अडथळा करु नये, बेदखल करु नये अशी तुर्तातुर्त मनाई ताकीद प्रतिवादी व तर्फे इसमांना दाव्याचे अंतिम निकालापावेतो होऊन मिळावी अशी विनंती वादी यांनी केली आहे.

**दावा मिळकतीचे वर्णन** –

०३. मौजे काटेभोगांव, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील शेत मिळकत–

| अ.क्रं. | सि.स.नं. | ऐकूण क्षेत्र |
|---|---|---|
| १. | ६९९ | ०.१२.०० |

| | | |
|---|---|---|
| | | पो.ख.०.०१.०० अशी एकूण ०.१३.०० आर. क्षेत्राची शेत मिळकत. |

त्याच्या चतुःसिमा–

| | |
|---|---|
| पूर्वेस– | रस्ता व त्यानंतर गट नं. ७०२ ही शेत मिळकत. |
| पश्चिमेस– | श्री. कृष्णात पांडुरंग कुंभार यांची शेत मिळकत. |
| दक्षिणेस– | गट नं. ६९६ व ७०० या शेत मिळकत. |
| उत्तरेस– | गट नं. ६९८ ही शेत मिळकत. |

वर नमुद मिळकत ही या दाव्याचा वाद विषय होय.

(यापुढे सदर मिळकतीस 'दावा मिळकत' असे संबोधण्यात येत आहे.)

**<u>अर्जातील कथन थोडक्यात खालीलप्रमाणे</u>** –

**०४.** वर नमुद मिळकत ही वादींचे पूर्वहक्कदार वडील मयत हिंदू (हिंदुराव) रामा वाळवेकर यांची प्रत्यक्ष मालकी व कब्जेवहिवाटीची मिळकत होती व आहे. दावा मिळकतीचा पूर्वीचा सर्वे नं. ३२०/२, ३२०/१५ असा होता. काटेभोगांव गावी अंमलात आलेल्या एकत्रीकरण योजनेनंतर त्याचा गट नं. ६६३ झाला. ग्रामपंचायत काटेभोगांव व वाळेवकरवाडी यांचे अलगीकरण होऊन स्वतंत्र ग्रामपंचायती झाल्यानंतर दावा मिळकतीचा सध्याचा गट नं. ६९९ झाला. सदर मिळकतीस वादीचे पूर्वहक्कदार वडील मयत हिंदू रामा

वाळवेकर यांच्या नावच्या नोंद सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी पूर्वीपासून होत्या व आहेत व सदरच्या नोंदी आजतागायत त्यांचेच नावे नोंद आहेत. त्याप्रमाणे सदर मिळकतीचे एकूण क्षेत्र पूर्वीपासून त्यांचे व वादींचे मालकी कब्जात होते व त्यांचे मृत्युनंतर दावा मिळकतीचे क्षेत्र वादींचे मालकी कब्जेवहिवाटीत आहे. वादी नं. १ ते ५ हे मयत हिंदू रामा वाळवेकर यांचे अनुक्रमे पत्नी, मुले व विवाहित मुलगी असे कायदेशीर व सरळ वारस आहेत. सदर मिळकतीत वादी सालोसाल वेगवेगळी पिके घेत आहेत.

**०५.** प्रतिवादी क्रं. १ व २ यांची दावा मिळकतीच्या दक्षीण बाजूस भूमापन गट क्रं. ७०० ही शेतमिळकत आहे. एकत्रीकरण योजनेपूर्वी दावा मिळकत तसेच गट नं. ७०० याच्या पूर्वीच्या सर्व्हे नंबरच्या तुकडयांचे एकत्रीकरण होऊन त्यांचे गटात रुपांतर झाले. दि.२५.०४.२०२२ रोजी वादी दावा मिळकतीमध्ये भात पिकाच्या नांगरटीपूर्वीच सपाटीकरण करत असताना प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी दावा मिळकतीमध्ये येऊन वादींना सपाटीकरणास विरोध करुन वादींना दावा मिळकतीमधून बेदखल करणेची भाषा बोलून वादीचे मालकी कब्जे वहिवाटीस हरकत करुन निघून गेले. त्यानंतर मे, २०२२ मध्ये वादींची दावा मिळकतीमध्ये पावसाळी भात पिकासाठीची नांगरट सुरु

असताना प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी दावा मिळकतीत पुन्हा येऊन वादी करत असलेल्या नांगरटीस हरकत अडथळा करु लागले. यावेळी प्रतिवादींनी वादींना दावा मिळकतीमधून बाहेर निघून जाण्याची धमकी दिली.

**०६.** दि. २९.०५.२०२२ रोजी दावा मिळकतीमध्ये वादींची कष्टमशागत सुरु असताना प्रतिवादी नं. १ व २ हे प्रतिवादी क्रं. ३ व ४ यांना सोबत घेऊन दावा मिळकतीत घुसले. सदर दिवशी त्यांनी दावा मिळकतीमधील काही क्षेत्र त्यांचे असलेचे सांगून कष्टमशागतीस हरकत व अडथळा केला. वास्तविकपणे दि. ११.०२.२०७ रोजी दावा मिळकत गट क्रं.६९९ ची रितसर हद्द कायम मोजणी भूमी अभिलेख, पन्हाळा यांचेमार्फत होऊन गट नं. ६९९ ची हद्द कायम झालेली आहे. सदर मोजणीस प्रतिवादी यांचेकडून कोणतीही हरकत आजतागायत हजर केलेली नाही. असे असताना प्रतिवादी दावा मिळकतीत घुसून वादींना बेदखल करणेचा प्रयत्न करत आहेत.

**०७.** प्रतिवादी हे वादींना बेकायदेशीरपणे व दांडगाव्याने दावा मिळकतीमधून बाहेर काढून त्यांना बेदखल करतील. प्रतिवादी बोलल्याप्रमाणे बेकायदेशीर कृती करणेस किंबहुना कायदा हातात घेणेस घाबरणार नाहीत. अशा परिस्थितीत कायदा पाळणा–या वादींना दावा मिळकतीमधून बेदखल

करणेसाठी प्रतिवादी करत असलेल्या बेकायदेशीर कृत्यांना प्रतिबंध होणे अत्यावश्यक व गरजेचे आहे. सदर प्रतिवादींचे कृत्ये ही बेकायदेशीर व अनाधिकाराचे असून वादींचे कायदेशीर हक्क आणि अधिकारांवर गदा आणणारे आहे. प्रतिवादी यांच्या बेकायदेशीर कृत्यांपासून सरंक्षण मिळण्यासाठी वादींना सदरचा दावा प्रतिवादी विरुध्द कायम मनाईसाठी दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज मंजूर करावा अशी विनंती केली आहे.

०८. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे नि.क्रं.२१ वर दाखल केले आहे. पुढे त्यांनी असे कथन केले आहे की, अर्जात नमुद केलेला मजकूर खोटा, बनावट व लबाडीचा असून तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादींच्या अर्जातील दावा मिळकतीचे वर्णन चुकीचे, अपुरे स्वरुपाचे केले असून अशी कोणतीही दावा मिळकत अस्तित्वात नाही.

०९. मौजे काटेभोगांव, ता. पन्हाळा, जि.कोल्हापूर येथील गट नं. ६९९, एकूण क्षेत्र ०.१३ आर ही मिळकत हिंदु रामा वाळेवकर यांचे मालकीची असुन त्यांचे दक्षीण बाजुस गट नं. ७००, एकूण क्षेत्र ०.१०.०० आर ही शेतजमिन मिळकती प्रतिवादी क्रं. १ व २ व इतर सहहिस्सेदार यांचे मालकी वहिवाटीची मिळकत आहे. प्रतिवादी क्रं. १ व २ हे दावा मिळकतीचे दक्षीण

बाजुकडील लगतचे मिळकत धारक आहेत. सदर मिळकतीच्या ७/१२ पत्रकी प्रतिवादी यांच्या नावांची नोंद प्रत्येकी ०.०२.४९ आर इतक्या क्षेत्रास नमुद आहे.

**१०.** याउलट वादी यांची सदर दावा मिळकतीमध्ये केव्हाही कब्जे वहिवाट नव्हती व नाही. अथवा वादी हे दावा मिळकतीमध्ये दि. २५.०४.२०२२ रोजी भात पिकाच्या नांगरटी पूर्वीचे सपाटीकरण करत नव्हते व नाही. तसेच वादी यांनी दि.२९.०५.२०२२ रोजी कोणतीही कष्ट मशागत केलेली नाही.

**११.** वादी व प्रतिवादी यांची ज्यांच्या त्यांच्या गट नंबरचे हद्दीप्रमाणे कब्जे वहिवाट आजअखेर कायम असून सदरची बाब वादी यांनी भूमि अभिलेख पन्हाळा यांचेमार्फत दावा मिळकतीबाबत दि. १०.०२.२०१७ रोजी केलेल्या मोजणी नकाशावरुन निश्चित होते. त्यामुळे प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी केंव्हाही वादी यांच्या दावा मिळकतीमधील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केलेला नाही अथवा वादीचे मालकीचे मिळकतीमध्ये अतिक्रमण केलेले नाही. त्यामुळे वादी यांचा तुर्तातुर्त मनाई अर्ज फेटाळणेत यावा व

वादीवर रक्कम रु. ५०,०००/– इतकी रक्कम वादीकडून प्रतिवादींना देणेत यावी अशी विनंती केली आहे.

१२. प्रतिवादी क्रं. ३ ते ५ यांनी त्यांचे म्हणणे नि. २० वर दाखल केले आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, वादी यांचा मनाई अर्जातील सर्व कथने खोटी व लबाडीची असलेने ती प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाहीत. दावा गट नंबर ६९९ व तीचे क्षेत्रफळ या संबंधाने केलेले वर्णन सर्व साधारण बरोबर आहे. तथापि, ते जाणुनबुजुन अपुर्ण केले असून प्रत्यक्ष सदर गट नंबरातील प्रत्यक्ष वस्तुस्थितीचे वर्णन वादीनी हेतुपूर्वक टाळलेले आहे. गट नं. ६९९ ही मिळकत कधीही वादी यांचे पुर्व हक्कदार हिंदुराव रामा वाळेवकर यांचे पुर्णतः कब्जे वहिवाटीस नव्हती. तसेच त्यानंतर सदर मिळकत त्यांचे वारस म्हणजे वादी यांचे दावा मिळकत पुर्णतः कब्जे वहिवाटीस नाही. तसेच दावा मिळकतीत वादी सालोसाल भात , नाचना अशी पिके घेतात ही वादीची कथने प्रतिवादी यांना मान्य नाहीत.

१३. प्रत्यक्षात दावा मिळकतीतील वहिवाटीशी प्रतिवादींचा प्रत्यक्ष संबंध असून प्रतिवादी नंबर १ व २ यांचा त्यांचेशी कोणताही संबंध नाही. त्यामुळे त्यांनी दावा मिळकतीत येणेचा अथवा वादींना अडचण करणेचा प्रश्नच

उद्भवत नाही. तथापि, प्रत्यक्षात वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ हे भाऊबंद असून ते एकमेकास सामील आहेत. केवळ दावेस कारण निर्माण करुन मे. कोर्टाची दिशाभुल करणे करीता सदर मजकुराची रचना वादी यांनी हेतुपुर्वक केली आहे.

**१४.** प्रत्यक्षात गट नंबर ६९९ ची मोजणी झालेली आहे हे बरोबर असून सदर नंबरची मोजणी होऊन त्याच्या फक्त हद्दी निश्चित झालेल्या असून त्या मोजणी अधिका–यांनी दाखविलेल्या आहेत. तथापि, सदर नंबरातील प्रत्यक्ष वस्तुस्थिती अथवा वहिवाट संबंधीची परिस्थीती नमुद केलेली नाही. प्रतिवादी क्रं. ३ ते ५ यांची दावा मिळकतीत घरे आहेत व ते अनेक वर्षापासून तेथे वास्तव्यास आहेत. तसेच वादीचे दावा मिळकतीत प्रतिवादीनी घुसणेचा प्रयत्न केला तसेच वादींना दावा मिळकतीतुन बाहेर काढणेची धमकी दिली संबंधीचा सर्व मजकुर खोटा असलेने तो प्रतिवादी यांना मान्य व कबुल नाही. वादीची दावा मिळकतीत पुर्णतः कधीही वहिवाट अथवा कब्जा नव्हता व नाही. त्यामुळे वादींना दावा मिळकतीतुन बेदखल करणेचा प्रश्न उद्भवत नाही. त्यामुळे वादी यांचा तुर्तातुर्त मनाई अर्ज नामंजूर करावी अशी विनंती प्रतिवादी यांनी केली आहे.

**१५.** वादीच्या विधिज्ञांचा युक्तिवाद ऐकला. वादीचे कथन तसेच संचिकेत दाखल असलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता खालील प्रश्नबिंदू विचारार्थ उपस्थित होतात. सदर प्रश्नबिंदूचे निष्कर्ष कारणमिमांसेह खालील प्रमाणे –

| **अ.क्र.** | **प्रश्नबिंदू** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीचे हक्कात प्रथमदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी |
| २. | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने आहे ? | होकारार्थी |
| ३. | उक्त अर्ज नामंजूर केल्यास वादी चे अपरिमित नुकसान होईल ? | होकारार्थी |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशा प्रमाणे |

**१६.** वादीतर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३ व २३ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| **अ.क्रं.** | **कागदाचा तपशील** | **दिनांक** | **दाखल कागद** |
|---|---|---|---|
| १. | काटेभोगांव ता. पन्हाळा येथील भूमापन गट क्रं. ६९९ चा सातबारा उतारा. | २२.०२.२०२१ | स.शि.प्रत |

| | | | |
|---|---|---|---|
| २. | उपअधिक्षक भूमी अभिलेख पन्हाळा यांचेकडील गट नं. ६९९ चा गटनकाशा. | ०७.१२.२०१६ | स.शि.प्रत |
| ३. | सर्व्हे नं. ३२०/२ चा सातबारा उतारा | ०३.०५.२०१८ | स.शि.प्रत |
| ४. | सर्व्हे नं. ३२०/१५ चा सातबारा उतारा | ०३.०५.२०१८ | स.शि.प्रत |
| ५. | गट क्रं. ६६३ चा सातबारा उतारा. | ०३.०५.२०१८ | स.शि.प्रत |
| ६. | गट क्रं. ६९९ चा सातबारा उतारा. | ०३.०५.२०१८ | स.शि.प्रत |
| ७. | गट क्रं. ६९९ चा हद्द कायम मोजणी नकाशा. | ११.०२.२०१७ | स.शि.प्रत |
| ८. | काटेभोगांव ता.पन्हाळा येथील गट क्रं.६९९ चा सातबारा उतारा | १७.०८.२०२२ | स.शि.प्रत |
| ९. | काटेभोगांव ता.पन्हाळा येथील गट क्रं.६९९ चा ८–अ उतारा. | १७.०८.२०२२ | स.शि.प्रत |

**१७.** प्रतिवादी क्रं. १ व २ तर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ४० सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | काटेभोगांव ता.पन्हाळा येथील गट क्रं.७०० चा सातबारा उतारा | – | झेरॉक्स |
| २. | प्रतिवादी क्रं.१ यांच्या ८–अ ची प्रत | ०४.०८.२०२२ | झेरॉक्स |
| ३. | प्रतिवादी क्रं.२ यांच्या ८–अ ची प्रत | ०४.०८.२०२२ | झेरॉक्स |

**१८.** प्रतिवादी क्रं. ३ व ४ तर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३७ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | कागदाचा तपशील | दिनांक | दाखल कागद |
|---|---|---|---|
| १. | खरेदीपत्र लिहून देणार श्री. लक्ष्मण येसबा वाळवेकर यांनी लिहून घेणार श्री. गणपती पिराजी कबाडे यांना लिहून दिलेले खरेदीपत्र. | ०९.०९.१९८५ | झेरॉक्स |
| २. | पंचायत समिती पन्हाळा यांनी दिलेला बाळू गणपती कबाडे यांना बायो गॅस संबंधी दाखला. | १०.०१.२०२३ | झेरॉक्स |
| ३. | ग्रामपंचायत वाळेवकवाडी घरफाळा भरलेचा दाखला | १८.०७.२०२२ | झेरॉक्स |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | गणू पिराजी कबाडे कराबद्दल पावती | २०२२/२०२३ | झेरॉक्स |
| ५. | गणू पिराजी कबाडे कराबद्दल पावती | २००३/२००४ | झेरॉक्स |
| ६. | गणपती पिराजी कबाडे यांचे लाईट बील. | डिसेंबर २०१५ | झेरॉक्स |
| ७. | गणपती पिराजी कबाडे यांचे लाईट बील. | एप्रिल २०२२ | झेरॉक्स |

**१९.** प्रतिवादी क्रं. ५ तर्फे दावा मिळकतींच्या संदर्भात नि.क्रं. ३९ सोबत दाखल केलेले कागद खालील प्रमाणे.

| **अ.क्रं.** | **कागदाचा तपशील** | **दिनांक** | **दाखल कागद** |
|---|---|---|---|
| १. | बुधाजी लक्ष्मणी वाळवेकर, लक्ष्मण येसबा वाळवेकर व निवृत्ती लक्ष्मण वाळवेकर यांनी लिहून दिलेले संचकारपत्र | २०.०३.१९९२ | झेरॉक्स |
| २. | कराबद्दल भरलेली पावती | २०२२/२०२३ | झेरॉक्स |
| ३. | घरफाळा दाखला | १६.११.२०२२ | झेरॉक्स |
| ४. | ग्रामपंचायत वाळवेकरवाडी येथील ग्रा.पं.मि. न. २८३ चा असेसमेंट उतारा. | १६.११.२०२२ | स.शि.प्रत |
| ५. | ग्रामपंचायत वाळवेकरवाडी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | येथील ग्रा.पं.मि. न. २४५ चा असेसमेंट उतारा. | १८.०८.२००६ | झेरॉक्स |
| ६. | ग्रामपंचायत वाळेवकरवाडी कराबद्दल पावती सन २००१/२००२. | २०.०३.२००१ | झेरॉक्स |
| ७. | सर्व्हे (शौचालय) | १८.०२.२०१३ | झेरॉक्स |
| ८. | मारुती दादु कुंभार लाईट बील | ३०.०३.२००९ | झेरॉक्स |
| ९. | मारुती दादु कुंभार लाईट बील | ०६.१२.२०२२ | झेरॉक्स |

## का र ण मि मां सा

### प्रश्नबिंदू क्रं.१ करीता–

**२०.** तात्पुरता मनाई आदेश मिळविण्यासाठी वादीने दावा मिळकती विषयी त्यांचा असणारा हक्क व कब्जा सिध्द करतात का हे पाहाणे महत्वाचे आहे.

**२१.** वादी त्यांच्या अर्जात दावा मिळकत एकत्रीकरण योजना लागू झाल्यांनतर कशी अस्तित्वात आली व सर्व्हे नं. ३२०/२ व ३२०/१५ चा गट नंबर ६६३ कसा तयार झाला यासाठी नि.नं. ३/३ ते ५ वर सातबारा उतारे दाखल आहेत व सदर गट नं. ३६३ ही काटेभोगाव व वाळेवकरवाडी या ग्रामपंचायती स्वतंत्र झाल्यांनतर त्या मिळकतीचा गट नं. ६९९ म्हणजेच

आताची दावा मिळकत झाल्याचे कथन केले आहे. तसे दर्शविणारा सातबारा उतारा नि. ३/६ ला दाखल आहे. या सर्व बाबींना प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी कोणतेही आव्हान दिलेले नाही. त्यामुळे प्रथमदर्शनी गट नं. ६९९ अस्तित्वात येण्याची कथने वादी शाबित करतात.

२२. वादीचे असे कथने आहे की, दावा मिळकत ही वादीचे वडील हिंदूराव वाळवेकर यांच्या मालकी वहिवाटीची होती व त्यांच्या मृत्युपश्चात प्रस्तुत वादीची आहे. ही बाब दर्शविण्यासाठी वादीने नि. क्रं. ३/१ ला दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दाखल केला आहे. ज्यामध्ये वादीच्या पुर्वजांचे नाव नमूद आहे. तसेच नि.२३/१ व २ वर सदर दावा मिळकत वादीच्या नावे वारसाहक्काने नोंद झाल्याचा ७/१२ व ८-अ चा उतारा दाखल केला आहे तो बरोबर आहे.

२३. प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी वादी हे हिंदुराव वाळेवकर यांचे वारस असल्याचे मान्य केले आहे. प्रतिवादी क्रं. १ व २ दावा मिळकत वादीचे वडील हिंदूराव यांची मालकी असल्याचे मान्य करतात. इतकेच नव्हे तर आजरोजी वादी व प्रतिवादी क्रं. १ व २ हे ज्याच्या ताच्या वहिवाटीत कब्जात असल्याचेही कथन करतात. परंतु प्रतिवादी क्रं. ३ ते ५ वहिवाट एकमेव

वादीची असल्याचे नाकारतात.

२४. वादीनी दावा मिळकतीची मोजणी करुन हद्दी खुणा निश्चित केल्या आहेत हे प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांना मान्य आहे. परंतु प्रतिवादी क्रं. ३ ते ५ दावा मिळकतीत वादीची एकमेव कब्जे वहिवाट नाकारतात. प्रतिवादी क्रं. ३ ते ५ यांचे कथन आहे सदर दावा मिळकतीत काही क्षेत्र त्यांच्या पूर्वजानी खरेदी केलेली आहे व त्यामध्ये आजरोजी प्रतिवादी क्रं. ३ ते ५ ची घरे आहेत. सदर कथनांना पुष्ठी देण्यासाठी प्रतिवादी क्रं. ३ ते ५ यांनी दस्त यादी नि. क्रं. ३७ व ३९ वर दस्त दाखल केले आहेत. प्रतिवादी क्रं. ३ व ४ यांनी नि. क्रं. ३७/१ वर जी खरेदीपत्र दाखल केली आहेत ती दुय्यम प्रत आहेत. तसेच सदर खरेदीपत्र नोंदणीकृत नाहीत. एवढेच नव्हे तर सदर खरेदीपत्र हे गट नं. ७०० विषयीचे आहे. दावा मिळकती विषयी त्यात कोठेही उल्लेख नाही.

२५. तसेच दस्त यादी नि. क्रं. ३७/३ ते ५ या प्रतिवादी क्रं. ३ व ४ च्या कथित घरफाळा पावत्या आहेत. सदरचे घर हे वाळेकरवाडी या ग्रामपचंयातीत दर्शविले आहे. दावा मिळकत ही काटेभोगांव येथील आहे. सबब, सदरचे दस्त प्रतिवादी क्रं. ३ ते ४ यांना कोणतीही मदत करत नाहीत.

हिच परिस्थिती प्रतिवादी क्रं. ५ यांनी दस्त यादी नि. ३९ वर दाखल केलेल्या दस्ता बाबत. प्रतिवादी क्रं. ५ यांच्या पूर्वज्यांनी १९९२ साली केलेले संचकारपत्र नि.३९/१ वर दाखल आहे. ते देखील नोंदणीकृत नाही. तसेच सदर संचकार पत्रानुसार गट नं. ७०९ वाळवेकरवाडी येथील जागे विषयी कथित व्यवहार झाल्याचे दिसते. परंतु त्याचा ताबा दिल्याचेही त्यात नमुद नाही. याचाच अर्थ सदर नि.क्रं. ३९ वरील दस्त प्रतिवादी क्रं. ५ यांना दावा मिळकती संदर्भाने हक्क दर्शविण्यासाठी कोणतीही मदत करत नाहीत.

**२६.** या उलट वादीने दावा मिळकतीचा कब्जा दर्शविणारा ७/१२ उतारा, नमूना ८–अ या बाबी पटलावर आणल्या आहेत. तसेच दावा मिळकतीच्या हद्दी खुणा मोजणी होऊन कायम झाल्याचे प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी स्विकारल्याने ते ही प्रथमदर्शनी सिध्द झालेले आहे. प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी दावा मिळकतीत त्यांचा कब्जा असल्याचा कोणताही पुरावा समोर आणलेला नाही. सबब, वादीने प्रथदर्शनी दावा मिळकत एकमेव त्यांचा कब्जा असल्याचे सिध्द केले आहे. सबब, प्रश्नबिंदू क्रं. १ होकारार्थी नोंदवण्यात येतो.

**प्रश्नबिंदू २ व ३ करीता –**

२७. प्रतिवादी क्रं. ३ ते ५ चे असे कथन आहे की, दावा मिळकतीत त्यांची घरे आहेत. वादीना जर तात्पुरता मनाई आदेश मिळाला तर नुकसान प्रतिवादी क्रं. ३ ते ५ यांचे होणार आहे. त्यांच्यावर बेघर होण्याची वेळ येणार आहे. परिणामी अपरिमित नुकसान व न्यायाचा समतोल प्रतिवादी क्रं. ३ ते ५ च्या बाजूने आहे. परंतू वर नमूद केल्याप्रमाणे प्रतिवादी क्रं. ३ ते ५ हे जी घरे अस्तित्वात असल्याचे कथन करतात ती घरे ग्रामपंचायत वाळवेकरवाडी गट नं. ७०० मध्ये आहेत. ज्याचा दावा मिळकतीशी संबंध नाही. दावा मिळकत ग्रामपंचायत काटेभोगाव गट नं. ६९९ ची आहे. प्रतिवादी क्रं. १ व २ यांनी त्याच्या नि. ५ साठीच्या म्हणण्यात वादीचा कब्जा व त्यांचे वडील हिंदूराव यांची मालकी मान्य केलेली आहे.

२८. तसेच वादीनी प्रश्नबिंदू १ च्या कारणमिमांसे नुसार प्रथमदर्शनी त्यांचा एकमेव कब्जा व हक्क सिध्द केला आहे तो सरंक्षीत होणे गरजेचे आहे. त्यामुळे न्यायाचा समातोल हा वादीच्या बाजूने आहे. वादीचे हक्क सरंक्षीत न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे. सबब, तात्पूरता मनाई आदेश वादीच्या बाजूने दिल्यास प्रतिवादी क्रं. १ ते ५ चे कोणतेही नुकसान होणार नाही कारण ते लगतचे भूधारक (गट नं. ७००) आहेत. सबब,

प्रश्नबिंदू क्रं. २ व ३ वादीच्या हक्कात होकारार्थी नोंदविण्यात येतात.

**प्रश्नबिंदू ४ करीता –**

**२९.** प्रश्नबिंदू क्रं. १ ते ३ चे उत्तर हे वादीच्या हक्कात असल्याने प्रश्नबिंदू क्र . ४ चे निष्कर्षादाखल खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात आला आहे.

२. प्रतिवादी क्रं. १ ते ५ यांनी वादी यांचे दावा मिळकत मधील शांततामय कब्जे वहिवाटीस स्वतः अगर तर्फे इसम यांनी हरकत अगर अडथळा करुन नये अशी तुर्तातुर्त मनाई देण्यात येते.

३. नि. ३४ चा जैसे थे परिस्थितीचा आदेश रद्द करण्यात येतो.

४. उक्त अर्जाचा खर्च दाव्याच्या अंतिम निकालानंतर होणा–या खर्चाच्या आकारणीवेळी विचारात घेण्यात यावा.

Neha K.Nagargoje

Digitally signed by Neha K.Nagargoje
Date: 2023.05.03 17:46:42 +0530

(नेहा कों.नागरगोजे)

दि. ०३.०५.२०२३.

दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
कळे–खेरीवडे.